MHKO100000542008

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८</u>**

भैरु कांबळे -म.वा. वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे -म.वा. वगैरे.

## निशाणी क्र. १०२ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १, नियम १०(२) अन्वये वादी क्र.२ यांचे वारसांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा हा वाटप व कायम मनाईकरीता दाखल आहे. दावा प्रलंबित असताना दिनांक ३०/१०/२०२३ रोजी वादी क्र.२ गणपती राघु कांबळे हे मयत झाले असुन त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यात आले. परंतु, इतर वादी व मयत वादी क्र.२ यांचे वारसांचे हितसंबंध हे परस्पराविरोधी असल्याने तसेच, ते दावा चालविणेस प्रतिसाद देत नसलेने त्यांना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणेकरीता विनंती केली. याऊलट, प्रतिवादी यांनी अर्जातील कथन नाकारुन वादी क्र.२ हे एक वर्षापूर्वी मयत झाले असुन त्यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसल्याने त्याचे वारस या कामात हजर होत नाहीत तसेच, वादींनी वेळेत व योग्य ती तजवीज केलेली नसुन प्रस्तुतचा अर्ज केवळ दावा लांबवणेकरीता दाखल केला असल्याने नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.२ हे मयत झालेनंतर त्यांचे वारस अभिलेखावर आणले असुन इतर वादी व वादी क्र.२ यांचे वारसांचे हिसंबंध हे परस्पराविरोधी आहेत. प्रस्तुत दावा हा वाटपाकरीता दाखल असल्याने वादी क्र.२ यांच्या वारसांचे हितसंबंध हे इतर वादींच्या विरोधात असल्याने प्रस्तुत दाव्यामध्ये इतर वादींना दावा योग्य प्रकारे चालविता येणार नाही. शिवाय, वादी क्र.२ यांचे वारसांना वादी म्हणुनच पुढे ठेवल्यास इतर वादींच्या हक्कावर बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, दाव्यामध्ये गुंतागुंत वाढण्याची देखील शक्यता आहे. याऊलट, वादी क्र.२ यांचे वारसांना प्रतिवादी म्हणुन सामील केल्यास

त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. शिवाय, दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरीता मदत होणार आहे. त्यामुळे, वादी क्र.२ यांच्या वारसांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन सामील करण्यास वादीस परवानगी देणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादी क्र.२ यांचे वारसांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन सामील करुन तशी दुरुस्ती मुदतीत केलेनंतर त्याची प्रत दाखल करावी.

०३. वादींनी दुरुस्ती प्रत दाखल केल्यानंतर नवीन सामील करण्यात आलेल्या प्रतिवादींना समन्स काढण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2025.02.17 17:11:12 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १५/०२/२०२५.